दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com
महाराष्ट्र
सूर्योदय
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

कोकण || वर्ष ६ वे || अंक ८५ || सोमवार २३ मार्च २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

पालघर मोहल्ला येथे दावत ए इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. अस्मिता केंद्रे यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

मंडणगड : प्रतिनिधी,

जमातूल मुस्लीमीन पालघर व गल्फ कमिटी पालघर यांच्यावतीने पवित्र रमजान महिन्यानिमित्त १८ मार्च २०२६ रोजी पालघर मोहल्ला येथे दावत ए इफ्तार व सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास जि. प. अध्यक्षा अस्मिता केंद्रे यांच्यासह सभापती, उपसभापती व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.ङ्गङ्ग तालुकावासीयांमध्ये परस्पर प्रेम व धार्मिक सौहार्द वृध्दीगंत व्हावा या उद्देशाने आयोजीत करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी पालघर मोहल्यातील युवा, जमातूल मुस्लीमीन कमिटी व गल्फ कमिटीचे पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमास उपस्थित नूतन जि. प. अध्यक्षा सौ. अस्मिता केंद्रे, जि. प. सदस्य प्रताप घोसाळकर, पंचायत समिती सभापती प्रणाली चिले, उपसभापती दीपक मालुसरे, सदस्य अनिल रटाटे, सौ. दीप्ती घडशी या नवनिर्वाचित लोकप्रधीनिधींचा सत्कार करण्यात आला. याच बरोबर सामाजिक कार्यकर्ते इम्रान कर्देकर यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी या मान्यवरांनी आपल्या मनोगतात सर्वांना पवित्र रमजान महिन्याच्या व रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.ङ्गङ्ग कार्यक्रमास अनंत शिंदे, गजानन तांबुटकर, डॉ. अमित गिरासे, माजी पंचायत समिती सदस्य नितीन म्हामुणकर, इरफान बुरोंडकर आदि मान्यवर उपस्थित होते. तर पालघर मोहल्ल्यातील सामाजिक कार्यकर्ते इम्रान कर्देकर, अंजुम चिखलकर, वसीम चिखलकर, मुन्नावर टेटवलकर, मक्कबूल कोंडेकर, गणी चिखलकर, जहीर चिखलकर, मुजफ्फर कोंडेकर, अस्लम कोंडेकर, नूरमुहमद चिखलकर, मुराद टेटवलकर, अबू बकर बुरोंडकर, सत्तार चिखलकर, शोएब करदेकर, आरफात कोंडेकर, अदनान चिखलकर, फारूक करदेकर, अरबाज चिखलकर, सलमान चिखलकर, मुजम्मील कोंडेकर, नासिर कोंडेकर, नज्जो मुल्ला, लियाकत कोंडेकर, करीम कुडूपकर, अब्दुल वाहब कुडूपकर, अहमद कोंडेकर आदी पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.ङ्गङ्ग कार्यक्रमास गल्फ कमिटीचे पदाधिकारी शकील चिखलकर,बिलाल चिपळूणकर, समीर चिखलकर, शौकत चिखलकर, फैसल कुडुपकर, अफताफ कोंडेकर, तनवीर कर्देकर आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

गोवा बनावटीची दारूची चोरून होणारी वाहतुक करणा-यास नेरळ पोलीसांनी केले गजाआड

कर्जत(प्रतिनिधी)

नेरळ पोलिसांनी अवैध दारू वाहतुकी विरोधात मोठी कारवाई करत एक टँकर जप्त केला आहे. या कारवाईत सुमारे १ कोटी रुपयांहून अधिक किमतीची दारू जप्त करण्यात आली असून एक आरोपी ताब्यात घेण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २१ मार्च रोजी रात्री गुप्त माहितीच्या आधारे नेरळ पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. राजस्थान येथील लादुराम खियाराम बिष्णोई ४२ वर्षीय आरोपी आपल्या ताब्यातील टँकरमधून गोवा बनावटीची दारू बेकायदेशीररीत्या वाहतूक करत होता. पोलिसांनी त्याला कर्जत-मुरबाड मार्गावर अडवून ताब्यात घेतले. या कारवाईत टँकरसह विविध ब्रँडची व्हिस्की व व्होडकाच्या हजारो बाटल्या जप्त करण्यात आल्या. एकूण जप्त मालाची किंमत सुमारे १,०१,२७,६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक आँचल वरिष्ठ अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड नेरळ सहा. पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, पोलीस उपनिरीक्षक सुनिल शेंबडे पोलीस उपनिरीक्षक किसवे, पोहवा गुजराथी,पोहवा लावरे,पोहवा खंडागळे,पोहवा वाघमारे,पोना गर्जे, पोलीस अंमलदार केकाण, पोलीस अंमलदार आश्रुबा बेंद्रे,पोलीस अंमलदार पिसाट, पोलीस अंमलदार वांगणेकर पोलीस अंमलदार कनके,पोलीस अंमलदार डाखोरे, या नेरळ पोलिसांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. आरोपीविरोधात नेरळ पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं.५९/२०२६ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम चे कलम ६५ (अ)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सिद्धिविनायक रहिवासी संघाचा सुवर्ण महोत्सवी वर्ष मोठ्या उत्साहात साजरा

मुंबई,(प्रतिनिधी): सिद्धिविनायक रहिवासी संघ स,ला मार्ग,शिवडी, गुढीपाडव्याच्या शुभ दिनी संघ यंदाचे सुवर्ण महोत्सवी ५० वे वर्ष मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. संघातर्फे सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली. तसेच या निमित्ताने शोभायात्रा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,क्रिकेट स्पर्धा, होम मिनिस्टर, मंगळागौर, हळदीकुंकू, तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विभागातील नागरिकांनी सदर कार्यक्रमास उपस्थित राहून तीर्थप्रसादा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. ङ्गसिद्धिविनायक रहीवाशी संघाचे उत्सव कमिटी, संघाचे पदाधिकारी, सदस्य , महिला, मुलं आणि मुलींनी कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी खूप मेहनत घेतली.

त्या बद्दल सिद्धीविनायक रहिवाशी संघातील पदाधिकाऱ्यांनी सर्वांचे आभार मानले.

मंडणगडमध्ये गुंतवणूक जागृतीची नवी क्रांती! चा भव्य इन्वेस्टर अवेअरनेस प्रोग्राम उत्साहात संपन्न

मंडणगड प्रतिनिधी,

२१ मार्च २०२६ रोजी मंडणगड तालुक्यात प्रथमच नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या विशेष पुढाकारातून यशतेज फाउंडेशनतर्फे भव्य आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला १५० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत गुंतवणूक शिक्षणाची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमात '''' चे अधिकृत वक्ते कपिल पागे आणि कोटक बँकेचे अधिकारी सौरभ अनेराव यांनी म्युच्युअल फंड, सुरक्षित गुंतवणूक, तसेच फसवणूक टाळण्याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. योग्य आर्थिक निर्णय कसे घ्यावेत, पैसा सुरक्षित ठेवून वाढवण्याचे मार्ग याबाबत उपस्थितांना सखोल माहिती मिळाली.

यशतेज फाउंडेशनच्या सागर बुटाला(फायनान्स ॲडव्हायझर), निलेश गोडघास, मयूर पंडित, प्रशांत सुर्वे आणि पुरुषोत्तम कर्वे यांच्या प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी ठरला. मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. अँड. यश घोसाळकर यांनी आभार प्रदर्शन करताना सांगितले की, ''मंडणगडमध्ये अशा कार्यक्रमाची ऐतिहासिक सुरुवात झाली असून, भविष्यात आर्थिक फसवणुकीला आळा बसण्यास मोठी मदत होईल.''यशतेज फाउंडेशनतर्फे अशा जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन पुढेही सातत्याने करण्यात येणार असून, नागरिकांनी गुंतवणूक करण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले. ''शिका, समजा आणि सुरक्षित गुंतवणूक करा!''

संपादकीय

जिल्ह्याजिल्ह्यांत नशामुक्तीचा संकल्प

भारत विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना समाज नशामुक्त असणे अत्यावश्यक आहे. तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आणि निरोगी समाज घडविण्यासाठी नशामुक्ती अभियान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जनजागृती, समुपदेशन आणि सामूहिक प्रयत्नांमधूनच व्यसनमुक्त भारताचे स्वप्न साकार होऊ शकते.

नशामुक्ती अभियान आपल्या भारत देशाच्या शतक महोत्सवी स्वातंत्र्याच्या वर्षापर्यंत विकसित भारत होण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी देशातील सामाजिक परिस्थिती, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ आणि सुशासन अशा विविध बाबींचा समावेश आहे. म्हणजे आपला देश एक विकसित राष्ट्र म्हणून ओळखला जाणार आहे; परंतु असे असले तरी त्या देशातील नागरिक नशामुक्त असले पाहिजेत तरच देश खऱ्या अर्थाने विकसित बनू शकतो. देशाच्या विकासासाठी नशामुक्ती होणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे जनजागृती झाली पाहिजे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०२० रोजी देशात नशामुक्ती भारत अभियान सुरू केले. प्रथम देशातील २७२ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्याचे निश्चित करण्यात आले होते. सध्या ३७२ जिल्ह्यांमध्ये नशामुक्ती अभियान राबविले जात आहे. आपल्या देशात सन २०२१ मध्ये ७५२ जिल्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश राज्यात सर्वात ७५ जिल्हे असून सर्वात कमी गोवा राज्यात २ जिल्हे आहेत, तर आपल्या महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे आहेत. तेव्हा देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्ती अभियान राबविणे गरजेचे आहे.

नशामुक्ती अभियानाचा मुख्य उद्देश मादक द्रव्यांपासून मुक्त करणे, तरुणाईला जागृत करणे आणि नशा व्यक्तींचे पुनर्वसन करणे ही आहेत. म्हणजे नशामुक्ती अभियान निरोगी जीवन आणि आनंददायी समाज घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी देशातील तरुणाईमध्ये नशामुक्ती विषयी जनजागृती अतिशय महत्त्वाची आहे. काही ठिकाणी नशा करून गळफास घेतल्याची उदाहरणे आहेत. तसेच अपघात झालेले आहेत तरी सुद्धा आकस्मिक मृत्यूची नोंद केली जाते. बस डेपोच्या परिसरात, रेल्वे पटरी, पडीत इमारतीमध्ये, वस्ती नसलेल्या रस्त्याच्या बाजूच्या झुडपात, फुटपाथ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर इत्यादी ठिकाणी नशा करणारी मुले व वृद्ध व्यक्ती पाहायला मिळतात. यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्तीसाठी जनजागृती झाली पाहिजे. त्यासाठी मादक द्रव्यांच्या सेवनामुळे होणारे वाईट परिणाम सुजाण नागरिकांना सांगावे लागतील. यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, विविध स्वयंसेवी संस्था अशा संस्थांमार्फत जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी. तसेच त्या आनुषंगाने विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यसनाधीन झालेल्या नागरिकांचे सुद्धा योग्यप्रकारे समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत. यातून निरोगी समाज कसा निर्माण करता येईल त्या दृष्टिकोनातून मादक द्रव्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल, त्याप्रमाणे प्रयत्न करावा. यातून देशात निरोगी समाज निर्माण करता येईल. याचा चांगला परिणाम लोकांचे सरासरी आयुर्मान वाढण्याला मदत होणार आहे. याला कारण वैद्यकीय सेवा आणि पोषण आहार म्हणता येईल. याच्या जोडीला नशामुक्ती महत्त्वाची आहे. सध्या देशात मादक द्रव्यांचा विचार केल्यास यात तरुण पिढी जास्त आहारी गेलेली दिसत आहे. यामुळे विकसित भारत राष्ट्र कसे होणार? केवळ जनजागृती करून चालणार नाही, तर शासन पातळीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. एकीकडे मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध करणे आणि दुसरीकडे शासन मान्य देशी दारूचे दुकान म्हणून मान्यता देणे. त्याला सुजाण नागरिकांनी विरोध केल्यास शासनाचा महसूल बुडतो अशी आरडाओरड सुरू केली जाते. मात्र यावरती कायदेशीरपणे प्रतिबंध होणे गरजेचे आहे. यासाठी सामूहिक जागृती, पथनाट्य व पोस्टर्स लावून जनजागृती केली जात आहे. काही ठिकाणी तरुण पिढी बरबाद होऊ नये म्हणून दुकाने बंद करण्याचा प्रयत्न सुद्धा झाला. दारूची दुकाने काही दिवस बंद करण्यात आली. मात्र काही दिवसांनी पुन्हा दारूची दुकाने सुरू करण्यात आली. मादक द्रव्यांच्या सेवनाने गंभीर आजार, मानसिकदृष्ट्या खचून जाणे, कर्जबाजारी, शारीरिक समस्या अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. ग्रामीण भागात अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत चालले आहेत.

गुहागरमधील जामसूद येथे सोनसाळवी देवीचा शिमगोत्सव उत्साहात संपन्न 'खुणा काढणे' कार्यक्रमाकडे भाविकांचा ओघ

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील जामसूद गावात ग्रामदैवत सोनसाळवी देवीच्या शिमगोत्सवाची सांगता अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडली. दरवर्षीच्या परंपरेनुसार गुढी पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शिंपणे उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक 'खुणा काढणे' या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली होती.ङ्गजवळपास महिनाभर चाललेल्या गावभेटीनंतर देवीची पालखी पुन्हा मंदिरात आगमन करताच परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. ढोल-ताशे आणि सनईच्या गजरात ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने पालखी नाचवत शिंपणे उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.ङ्गदरम्यान, या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरणारा 'खुणा काढणे' हा कार्यक्रम शेकडो वर्षांपासून सुरू असलेली परंपरा आहे. या प्रथेनुसार, भाविक आपल्या मनातील इच्छा व्यक्त करून गुप्त ठिकाणी जमिनीत नारळ लपवून ठेवतात. त्यानंतर पालखीचे भोई कोणतीही पूर्वकल्पना नसताना तो नारळ शोधून काढतात. असे घडल्यास संबंधित भाविकाची मनोकामना पूर्ण होते,अशी श्रद्धा आहे.ङ्गजामसूद गावातील ही अनोखी परंपरा राज्यभरातील भाविकांना आकर्षित करत असून, दरवर्षी मोठ्या संख्येने तालुक्यातूनच नव्हे तर जिल्ह्यातून भाविक येथे दाखल होत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. यावेळी मानकरी आणि प्रमुख प्रकाश साळवी यांनी सोनसाळवी देवीची महत्वपूर्ण माहिती सांगितली

न्यू इंग्लिश स्कूल पाभरे शाळेत पर्यावरण पूरक होळी व स्वच्छता अभियान संपन्न

द. रा. जि. उपसंपादक
संतोष उध्दरकर.

म्हसळा:सामाजिक वनिकरन म्हसळा यांच्या विद्यमाने शाळेत स्वच्छता अभियान व पर्यावरण पूरक होळी साजरी, दिवसंदिवस जंगल नष्ट होऊन पर्यावरणाला धोका निर्माण होत असुन तापमानाचा पारा चढत असल्याचे दिसत आहे, कोकणातील होळी सण हा महत्वाचा मानला जात असला तरी वृक्ष तोड करून पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे, त्यामुळे विविध शाळा, संस्थे मध्ये पर्यावणरण पुरक होळी का साजरी करावी यासाठी उपक्रम राबवुन वृक्ष तोड करू नये, पर्यावरण पुरक होळी साजरी करा असे या कार्यक्रमाच्या माध्यमातुन सांगितले जाते. या वेळी न्यु इग्लिश स्कुल पाभरा इथे वनक्षेत्रपाल प्रशांत पाटील यांनी अतिशय उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या सुरुवातला भीमराव सूर्यतळ यांनी निसर्ग व स्वच्छता वर गीत सादर करून सर्वांचे मन जिंकले.शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक मंगेश कदम व वसावे यांनी देखील होळी सण हा पूर्वापार चालत आलेली संस्कृती आहे त्याची जपणूक केली पाहिजे. वनरक्षक आकाश गायकर यांनी सर्वांचे आभार मानले..

पळसदरी येथे मठात श्री स्वामी समर्थ प्रकटदिन उत्साहात साजरा

कर्जत: जयेश जाधव

प्रतिवर्षाप्रमाणे श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे श्री स्वामी समर्थ प्रकटदिन उत्साहात साजरा झाला. यावेळी हजारो भाविकांनी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रतिवर्षाप्रमाणे गुढीपाडव्याला विण्यावर श्री स्वामी समर्थ या षडा:क्षरी मंत्राच्या जपाने या कार्यक्रमाला सुरूवात झाली तसेच श्री स्वामी समर्थ प्रकटदिनी पहाटे ब्रम्ह मुहूर्तावर श्री स्वामी समर्थांचा सामुदायिक जप त्यानंतर काकडआरती,सकाळी महाअभिषेक,दत्तयाग, दुपारी महाआरती, महाप्रसाद तसेच दुपारी विवेक भागवत निर्मित द स्वर बरसात इव्हेंट प्रस्तुत भक्तीगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमात सुर नवा ध्यास नवा कार्यक्रमातील गायिका कु.आरोही प्रभुदेसाई आणि गायक अक्षय जोशी यांनी विविध भक्तीगीते सादर केली त्यांना तबल्यावर विवेक भागवत,संवादिनीवर स्वत: अक्षय जोशी,साईड -हिदमवर यश हजारे तसेच सारंगी प्रभुदेसाई यांनी साथ संगत केली या कार्यक्रमाचे निवेदन अनुया गरवारे-धारप यांनी केले. ङ्ग या कार्यक्रमादरम्यान सामाजिक बांधिलकी जपणारे दोन संगीत विशारद विवेक भागवत आणि रुचिरा निगुडकर यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. सायंकाळी श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थांच्या गजरात,भजन,ब्रम्हा ढोलताशांच्या गजरात उंट, घोड्यांसह फटाक्यांच्या आतषबाजीत स्वामींच्या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.रात्री महाआरती, महाप्रसाद तसेच गौरव महाराष्ट्र विजेता वैभव थोरवे यांचा स्वर वैभव-ताल मंगेश संच हा भक्तीगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला त्यांना पखवाज मंगेश बडेकर,तबला दैवत देशमुख, ढोलक आदित्य पवार,ऑप्टोपॅड रूपेश कर्णुक,कि बोर्ड प्रतिक वैती, संबळ निमिष जुईकर यांनी साथसंगत केली. रात्री बारा वा. पहाटेपासून सुरू झालेल्या कार्यक्रमाची सांगता झाली. ङ्गयाप्रसंगी विक्रांत दरेकर, राजू पोतदार, वकील राजेंद्र निगुडकर, ,वकील प्रदीप सुर्वे,अशोक शितोळे, विठ्ठल सुर्वे,रघुनाथ निगुडकर,,रितेश मांडे, अतुल सावंत,सचिन दरेकर, नरेंद्र दरेकर,महेंद्र निगुडकर, विशाल निगुडकर, दिलीप पांडे,पांडू बडेकर, ग्रामस्थ तसेच हजारोंच्या संख्येने स्वामी भक्त उपस्थित होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील e-KYC दुरुस्तीसाठी ३१ मार्च पर्यंत संधी

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुबंई,मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र काही लाभार्थीनी माहीती भरताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडल्याचे निर्दशनांस आले आहे.प्रामुख्याने कुटुबांतील सदस्य सरकारी विभाग,उपक्रम मंडळे, भातर सरकार किंवा

राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेत नियमित/कंत्राटी कर्मचारी म्हणुन कार्यरत आहात का किंवा सेवानिव्रुत्तीनंतर सेवानिव्रुत्त वेतन घेत आहेत का ,या बाबत चुकीच्या माहीतीची नोंद झाल्याची प्रकरणे आढळली आहेत. अश्या लाभार्थी महीलांना त्यांच्या अर्जातील माहीती दुरुस्त करण्यासाठी ऑनलाईन माध्यमातुन पुन्हा एकदा संधी देण्यांत आली आहे.ही सुधारणा करण्याची सुविधा दि. ३१ मार्च २०२६ उपलब्ध राहणार असुन या बाबतचा शासन निर्णय दि.फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यांत आला आहे.याची सर्व लाडक्या बहीणींनी नोंद घ्यावी असे शासनातर्फे आवाहान करण्यांत आले आहे.

इराण युद्धाचा एअर इंडियाला मोठा फटका : तब्बल २,५०० उड्डाणे रद्द एअरलाईनची क्षमता ३० टक्क्यांवर

नवी दिल्ली : इराणमधील सुरू असलेल्या संघर्षामुळे एअर इंडियाने गेल्या तीन आठवड्यांत पश्चिम आशियातील सुमारे २,५०० उड्डाणे रद्द केली आहेत. सध्या या भागात एअर इंडियाच्या नियमित वेळापत्रकाच्या तुलनेत केवळ ३० टक्के उड्डाणे सुरू असल्याची माहिती एअरलाइनचे मुख्य कार्यकारी अधिकारी कॅम्पबेल विल्सन यांनी कर्मचा-यांना पाठवलेल्या पत्रात दिली आहे.

विल्सन यांनी पत्रात नमूद केले आहे की, मध्यपूर्वेतील संघर्षामुळे केवळ एअर इंडियाच नव्हे, तर संपूर्ण विमान वाहतूक क्षेत्रावर आर्थिक परिणाम होऊ लागला असून विमान इंधनाचे दर दुपटीने वाढले आहेत. हवाई क्षेत्र आणि विमानतळ बंद असल्याने किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव एअर इंडियाला आपली ७० टक्के उड्डाणे स्थगित करावी लागली आहेत.

दरवाढीचाही ग्राहकांना फटका बसण्याची शक्यता

विमानांच्या इंधनाचे दर दुपटीहून अधिक वाढले आहेत. याचा मोठा आर्थिक फटका पुढील महिन्यापासून बसण्याची शक्यता आहे. वाढत्या खर्चाची भरपाई करण्यासाठी विमान कंपनीने नवीन तिकिटांवर फ्युएल सरचार्ज (इंधन अधिभार) लागू केला आहे. ब्रिटन, युरोप आणि उत्तर अमेरिकेला जाणारी विमाने आधीच लांबच्या मार्गाने जात होती, आता त्यात आणखी बदल करून ती अधिक लांबून वळवण्यात आली आहेत. यामुळे वेळ आणि इंधन दोन्ही जास्त लागत आहे.

आर्थिक अनिश्चिततेमुळे मागणीवरही परिणाम

आर्थिक अनिश्चिततेमुळे प्रवाशांच्या मागणीवरही परिणाम होत आहे. प्रत्येक ग्राहक वाढीव भाडे देण्यास तयार नसतो. त्यामुळे मागणी घटण्यापूर्वी आम्ही भाडे किती वाढवू शकतो याला एक मर्यादा आहे,

असेही विल्सन यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, काही जागतिक एअरलाईन्स आपली क्षमता कमी करत असताना, एअर इंडियाने युरोप आणि उत्तर अमेरिकेसारख्या बाजारपेठांमध्ये नवीन मागणी पाहून अतिरिक्त उड्डाणे तैनात केली आहेत.

सध्या केवळ सुरक्षेला प्राधान्य

कर्मचा-यांना संबोधित करताना विल्सन म्हणाले की, सध्याची परिस्थिती अत्यंत अस्थिर आहे. जे कर्मचारी प्रत्यक्ष प्रभावित क्षेत्रात काम करत आहेत, त्यांच्या आव्हानांची कंपनीला जाणीव आहे. आमची टीम परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे आणि त्यानुसार बदल करत आहे. सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता राहील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

प्रेमविवाह केल्याच्या रागातून तरुणाला विवस्त्र करून काढली धिंड; जळगावमधील क्रूर घटना

जळगाव: प्रेमविवाह केल्याच्या रागातून मुलीच्या नातेवाईकांनी तरुणाला नग्न करून बेदम मारहाण करून त्याची गावभर धिंड काढल्याचा प्रकार जळगाव जिल्ह्यात भुसावळ तालुक्यात समोर आला आहे. या घटनेत पोलिसांनी दहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे. जखमी तरुणाला रुग्णालयात भरती करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

भुसावळ तालुक्यातील खडका गावातील चेतन दिलीप जंगले या तरुणाने आपल्याच समाजातील धनश्री पाटील या तरुणीशी नाशिक पंचवटी येथे जाऊन प्रेम विवाह केला, मात्र हा विवाह मुलीच्या माहेरच्या लोकांना मान्य नव्हता, विवाह झाल्याच्यानंतर चेतन जंगले हा त्याच्या पत्नीसह त्याच्या नातेवाईकांच्याकडे आल्याची माहिती मुलीच्या नातेवाईकांना मिळताच त्यांनी खडका गावात जाऊन चेतन जंगले सह त्याच्या पत्नीला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी काही जणांनी त्याला नग्न करून गावात धिंड काढल्याचा ही धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बेदम मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न होत असल्याचे लक्षात आल्यावर गावातील काही जणांनी मध्यस्थी करून त्याची सुटका केली, त्यामुळे अनर्थ टळला असला तरी, या संपूर्ण घटनेने समाज मन सुन्न झाले आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता,पोलिसांनी तातडीने मारहाण करणाऱ्या दहा बारा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करून पाच जणांना अटक केली आहे.

तर मिळालेल्या माहितीनुसार, प्रेमविवाहाच्या वादातून तरुणाला नग्न करून खांबाला बांधून मारहाण केल्याची ही खळबळजनक घटना भुसावळ तालुक्यात घडली. या प्रकरणी बाजारपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे. त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील तरुण- तरुणीने १८ मार्च २०२६ रोजी नाशिक येथे प्रेमविवाह केला. विवाहानंतर १९ मार्च रोजी त्यांनी भुसावळ तालुका पोलिस ठाण्यात हजर राहून विवाहाची माहिती दिली आणि दोघे जण तरुणाच्या मामाच्या घरी मुक्कामी होते.;२० मार्च रोजी तरुणीचे नातेवाइक व इतर १० ते १२ जणांनी तरुणाच्या मामाच्या घरी जाऊन तरुणीला मारहाण करत पळवून नेले. यानंतर संशयितांनी तरुणास खांबाला बांधून नग्न करत, लोखंडी रॉड व दगडाने मारहाण केली. त्यानंतर संशयितांनी या तरुणाला दुचाकीने त्यांच्या गावातील घरापर्यंत आणत मारहाण केली. त्याच्या आई-वडिलांनाही घर जाळण्याची धमकी दिली. जखमी अवस्थेत तरुणाला जळगाव जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याचा हात फॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या प्रकरणी बाजारपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकार्थ

बातमी -१पॉवरिकाची प्रारंभिक सार्वजनिक भागविक्री उद्या खुली होणार;

पॉवरिका लिमिटेड (''कंपनी'') ने आपल्या पहिल्या-वहिल्या प्रारंभिक सार्वजनिक भागविक्रीसाठी प्रति इक्विटी शेअर ३७५ ते ३९५ रुपयांचा किंमत पट्टा निश्चित केला आहे; प्रत्येक शेअरचे दर्शनी मूल्य ५ रुपये आहे.कंपनीची प्रारंभिक सार्वजनिक भागविक्री वर्गणीसाठी मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी खुली होईल आणि शुक्रवार, २७ मार्च २०२६ रोजी बंद होईल.गुंतवणूकदार किमान ३७ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३७ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आय पी ओ ७०० कोटी रुपयांपर्यंतचा ताजा अंक आणि प्रवर्तकांकडून नरेश ओबेरोई फमिली ट्रस्ट व कबीर आणि किमया फमिली ट्रस्ट यांच्याकडून ४०० कोटी रुपयांपर्यंतचा विक्री प्रस्ताव यांचा समावेश असलेला संयुक्त प्रस्ताव आहे.ही कंपनी एकात्मिक ऊर्जा समाधान प्रदाता असून, ती डिझेल जनरेटर सेट्स मध्ये विशेष प्राविण्य बाळगते; या जनरेटरचा वापर प्राथमिक (मुख्य) आणि पर्यायी (स्टँडबाय) अशा दोन्ही प्रकारच्या गरजांसाठी केला जातो.

बातमी -२चुपा चुप्सची मुलांसाठी क्रेझी रॅफे, ट्विस्टेड जेली

परफेट्टी व्हॅन मेल्ले कंपनीचा कन्फेक्शनरी ब्रँड चुपा चुप्सने क्रेझी रॅफे नावाची नवीन जेली बाजारात आणली आहे, ही जेली लांब, वाकडी-तिरपी असून आतमध्ये फिलिंग आहे, त्यामुळे रोजच्या स्नॅकिंगला मजेशीर ट्विस्ट मिळतो, दिसायला वेगळी आणि मजेदार असल्यामुळे किशोरवयीन आणि लहान मुलांसाठी खास तयार केली आहे. ३० ग्रॅ वजनाची ही जेली ₹२० ला मिळते.क्रेझी रॅफे तयार करताना एक साधी पण महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली. आजची तरुण पिढी फक्त चव बघत नाही. त्यांना दिसायला मजेदार, खेळता येईल अशी आणि मित्रांसोबत शेअर करता येईल अशी कँडी आवडते. रोजच्या क्षणांत थोडी मजा आणि उत्सुकता आणणारे स्नॅक्स त्यांना हवे असतात. लांब आणि वाकडी-तिरपी आकाराची जेली आणि जिराफपासून प्रेरित डिझाइनमुळे क्रेझी रॅफे साध्या कँडीला मजेशीर अनुभव देते.या जेलीच्या बाहेर स्ट्रॉबेरी चवीचे कव्हर आहे, जे लाल रंगाच्या २ छटांमध्ये दिसते, आतमध्ये क्रीमी व्हॅनिला फिलिंग आहे. आंबट आणि गोड चव एकत्र आल्यामुळे खाण्याचा वेगळा अनुभव मिळतो,

बातमी -३बडोदा बीएनपी परिबा मॅनेजमेंटचा चौथा वर्धापन दिन साजरा

भारतातील अग्रगण्य सरकारी बँक आणि युरोपमधील प्रसिध्द मालमत्ता व्यवस्थापन कंपनी यांच्या संयुक्त भागीदारीतून आकारास आलेल्या बडोदा बीएनपी परिबा ॲसेट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने आपल्या स्थापनेचा चौथा वर्धापन दिन साजरा करताना निधी व्यवस्थापनाचा दैदिप्यमान टप्पा गाठला आहे. व्यवस्थापनांतर्गत असलेला गुंतवणूकदारांचा एकूण निधी (एयूएम) तब्बल ५५,००० कोटी रुपयांपुढे झेपावला असून कंपनीने चौथ्या वर्धापनदिनी यशाचा हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. आपल्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त कंपनीने आणखी २६ शहरांमध्ये नवीन शाखा सुरु केल्या आहेत. या विस्तारासह कंपनीने देशभरातील १३२ हून अधिक शहरांमध्ये आपले जाळे विस्तारले आहे. या शाखा विस्तारातून कंपनीने गुंतवणूकदारांना गुंतवणूकीबाबत सर्व प्रकारच्या सेवा प्रदान करणारी भारतातील एक ॲसेट मॅनेजमेंट कंपनी म्हणून आपले स्थान अधिक बळ केले आहे.सर्व योजनांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे कंपनी सध्या व्यवस्थापित करत असलेल्या एकूण गुंतवणूक निधीत (एयूएम) समाधानकारक वाढ झाली आहे. मालमत्ता गुंतवणूकीच्या विविध प्रकारच्या श्रेणींमध्ये सातत्यपुर्ण कामगिरी ही प्रामुख्याने संशोधनावर आधारित गुंतवणूक आणि अतिशय सक्षम प्रक्रिया-केंद्रित दृष्टिकोन यामुळे शक्य झाली आहे. बातमी-४भारतीय टपाल खात्याच्या ३ नवीन प्रीमिअम सेवा

भारत सरकारच्या दूरसंचार मंत्रालयाच्या टपाल विभागाने राष्ट्रीय स्तरावर तीन नवीन प्रीमियम डिलिव्हरी सेवा सुरू केल्या आहेत २४ स्पीड पोस्ट, २४ स्पीड पोस्ट पार्सल आणि ४८ स्पीड पोस्ट. वेगाने विस्तारणाऱ्या एक्स्प्रेस लॉजिस्टिक्स आणि निश्चित वेळेत डिलिव्हरी देणाऱ्या क्षेत्रात इंडिया पोस्टची क्षमता अधिक बळकट करणे, हा या सेवा सुरू करण्यामागील मुख्य उद्देश आहे. या उत्पादनांच्या (सेवांच्या) लोकार्पण सोहळ्याचे आयोजन माननीय केंद्रीय दूरसंचार मंत्री श्री. ज्योतिरादित्य एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. याप्रसंगी माननीय दूरसंचार राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी, टपाल सचिव श्रीमती वंदिता कौल, टपाल सेवा महासंचालक श्री. जितेंद्र गुप्ता आणि सदस्य (संचालन) श्री. हरप्रीत सिंग यांचीही उपस्थिती लाभली.

या प्रीमियम सेवा सुरुवातीला देशातील सहा महानगरांमध्ये सुरू करण्यात आल्या आहेत. या सेवांचा विस्तार टप्प्याटप्प्याने टियर-१ आणि टियर-२ श्रेणीतील शहरांपर्यंत केला जाईल, जेणेकरून या सेवांचा आवाका अधिक व्यापक होईल आणि त्या जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचतील. या लोकार्पण सोहळ्यामध्ये सदर सहा महानगरांमधील प्रतिनिधींनी व्हर्च्युअल (दूरदृश्यप्रणाली) माध्यमातून सहभाग नोंदवला.थट



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
सूर्योदय
सोमवार २३ मार्च २०२६ पान ४

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

रमजान ईद निमित्त नगरसेवक मुश्ताक दाभिळकर यांना जि.प. सदस्य प्रताप घोसाळकर यांनी दिल्या शुभेच्छा

मंडणगड प्रतिनिधी

रत्नागिरी जिल्हा परिषदेचे सदस्य श्री प्रताप दादा घोसाळकर यांनी रमजान ईद निमित्त नगरसेवक श्री मुश्ताक दाभिळकर यांच्या मंडणगड येथिल निवासस्थानी जाऊन शुभेच्छा दिल्या.ङ्गङ्गमंडणगड तालुका शिवसेना समन्वयक श्री जितेंद्र दवंडे मंडणगड पंचायत समिती सभापती सौ प्रणाली ताई चिले उपसभापती श्री दिपकजी मालुसरे शिवसेना विभाग प्रमुख श्री संजयजी शेडगे पंचायत समिती गटनेते श्री अनिलशेठ रटाटे पंचायत समिती सदस्या सौ दिप्ती ताई घडशी नगरसेवक शहर प्रमुख श्री विनोदजी जाधव उद्योजक श्री संदेशशेठ चिले शिवसेना सचिव श्री सिध्देश देशपांडे युवासेना शहर सचिव श्री योगेश जंगम युवासेना उपस्थित होते.

ता.मंडणगड तिडे बर्वेवाडी गुढीपाडवा पालखी मिरवणूक मोठ्या थाटात ङ्गसालाबाद प्रमाणे यावर्षीही गुरुवार दिनांक १९/०३/२०२६ रोजी बर्वेवाडी ग्रामस्थ मंडळ महिला मंडळ व बालगोपाल मित्र मंडळ गुढीपाडवा या मंगळमय दिवशी गुढी स्थापना, सत्यनारायणाची महापूजा,व पालखी सजावट मिरवणूक मोठ्या थाटात सोहळा आयोजित केला आहे

तळा तालुक्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त जागा भरण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष!

तळा प्रतिनिधी कृष्णा भोसले

तळा तालुक्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त जागा सोनसडे, कर्नाळा फळशेत,निगुडशेत, वावेहवेली, काकडशेत, कळमशेत,बोरघरहवेली, अडनाळे,अशा अनेक महसुली गावात पोलीस पाटील नसल्याने या रिक्त जागा तातडीने भराव्यात अशी आग्रही मागणी नागरीकांच्या वतीने होत आहे. हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात गावागावात पोलीस पाटील असणे गरजेचे असताना शासन तळा तालुक्यातील या पोलीस पाटीलांच्या रिक्त जागा कडे दुर्लक्ष करीत असल्याचे बोलले जात आहे. पोलीस पाटील हा महसुली गावात असणे आवश्यक असतो तो नसल्याने नागरीकांना खुप हेलपाटे मारावे लागत आहे. नागरीकांना लागणारे व पंचनामा करण्यात पोलीस पाटील यांची सही ही जातीचे दाखले, उत्पन्न दाखले, विवाह दाखले, वारस पंचनामा अशाङ्गकिती तरी महत्त्वाचे कामासाठी पोलीस पाटील हा गाव कारभाराचा प्रत्यक्ष दर्शनी कणा असतो. परंतु शासन याङ्गजागा भरत नाही.ङ्ग अशा या गाव करभारातील महत्त्वाचा असणारे हे पदङ्गभरत नसल्याने सगळीकडे बोंबाबोंब असते. तरी शासनानेङ्गतळा तालुक्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त जागा त्वरितङ्गभराव्यात अशी मागणी होत आहे.

"श्रीवर्धनात रमजान ईद पारंपारिक उत्साहात; कोकणी संस्कृतीतून बंधुभावाचा अनोखा संदेश"

श्रीवर्धन प्रतिनिधी सोपान निंबरे: कोकणातील पारंपरिक संस्कृतीचा गोडवा अनुभव देणारी रमजान ईद (ईद-उल-फित्र) २०२६ यंदा श्रीवर्धन तालुक्यात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच तालुक्यातील ईदगाह मैदान आणि स्थानिक मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा करून शांतता, समृद्धी आणि बंधुभावासाठी प्रार्थना केली. रायगडसह संपूर्ण कोकण पट्ट्यात ईदचा सण सामाजिक एकोप्याचा संदेश देणारा ठरला. नमाज पठणानंतर एकमेकांना मिठी मारून "ईद मुबारक"च्या शुभेच्छा देताना सर्वत्र आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा गोडवा : कोकणी मुस्लिम घरांमध्ये ईदनिमित्त 'सांधन' आणि 'उकरा' या खास पारंपरिक पदार्थांची रेलचेल पाहायला मिळाली. याशिवाय शिरखुरमा, बिर्याणी यांसारख्या पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी विविध धर्मीय नागरिक एकत्र येत असल्याचे चित्र श्रीवर्धनमध्ये पाहायला मिळाले. हा सण केवळ धार्मिक न राहता सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरत असल्याचे जाणकारांनी सांगितले.

पर्यटनस्थळांवर गर्दी : ईदच्या सलग सुट्ट्यांचा फायदा घेत पर्यटकांनी कोकणातील समुद्रकिनाऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात धाव घेतली. श्रीवर्धन, हरिहरेश्वर, तसेच जवळील पर्यटन स्थळांवर पर्यटकांची लक्षणीय गर्दी दिसून आली. स्थानिक व्यावसायिकांसाठी ही ईद आर्थिक दृष्ट्याही उत्साहवर्धक ठरत आहे. सांस्कृतिक समन्वयाचे दर्शन : यंदा शिमगा (होळी) आणि ईद एकाच काळात आल्याने अनेक गावांमध्ये हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन सण साजरे केले. काही ठिकाणी पारंपरिक पालखी स्वागतासाठी मुस्लिम बांधवांकडून नारळ अर्पण करण्याची परंपरा आजही जपली जात असल्याचे भावनिक चित्र पाहायला मिळाले.ङ्गङ्गश्रीवर्धन तालुक्यात साजरी झालेली रमजान ईद ही केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक सलोखा, परंपरा आणि कोकणी संस्कृतीचे जिवंत उदाहरण ठरली आहे. विविधतेत एकतेचा संदेश देणारा हा सण समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा ठरत आहे.

बहिरेश्वराच्या उत्सवाला प्रारंभ; शिहू विभागातील भक्तांचा उत्साह वाहणार ओसंडून!

सहसंपादक -: नारायण म्हात्रे

भक्तांच्या हाकेला धावणारा व नवसाला पावणारा शिहु, ता. पेण येथील बहिरेश्वराच्या उत्सवाला चैत्र शुद्ध चतुर्थी रविवार २२ मार्च २०२६ रोजी ते चैत्र शुद्ध षष्ठी २४ मार्च २०२६ पर्यंत चालणार असून या सोहळ्यात अखंड हरिनाम नाम जप चालणार आहे. या सोहळ्याची सुरुवात झाली असून संपूर्ण कार्यक्रमात पहिल्या दिवशी बहिरेश्वर देवावर अभिषेक, तसेच कलश पुजन, मुर्ती पुजन, ध्वजारोहण अशा कार्यक्रमासह दुपारी ०१:०० ते ०५:३० संगीत भजन कार्यक्रम १) श्री बहिरेश्वर महिला भजन मंडळ शिहु, बुवा- लिलावती हरिश्चंद्र म्हात्रे, मृदुंगमणी- अमर कुथे, हार्मोनियम- निळकंठ पाटील.

२) श्री मरिआई महिला भजन मंडळ अटीवली यांचा बहारदार कार्यक्रम श्रोत्यांना पर्वणी मिळणार असून सायं. ०७:०० ते ०८:३० हरिपाठ, रात्री ०९:०० ते ११:३० किर्तनसेवा रामायणाचार्य, वाणीभुषण ज्ञानदेव महाराज जाधव (आळंदी) यांचे सुश्राव्य किर्तन होणार असून सोमवार २३ मार्च २०२६ रोजी पहाटे ०६:०५ वाजता हरि एक नामाची सुरुवात होईल, तसेच मंगळवार २४ मार्च २०२६ रोजी जन्म सोहळा बहिरेश्वरावर पुष्पवृष्टी केली जाईल, दुपारी ०१:०० ते सायं. ०४:०० तिर्थप्रसाद व महाप्रसाद, रात्री ०८:०० वाजता बहिरेश्वर व जोगेश्वरी मातेचा पालखी सोहळा संपूर्ण शिहु गावातून होईल. सदर सोहळ्यात लहान-थोर, ज्येष्ठ-श्रेष्ठ,



अबाल-वृध्द, माता-भगिनी तल्लीन होवून नाचणार असून यांसह मुंबई, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यासह ज्या ठिकाणी या देवाची महती पसरलेली आहे असे सर्व भक्तगण या उत्सवासाठी उपस्थित राहून या सोहळ्याची मजा घेणार आहेत,

तसेच या सोहळ्याचे खास आकर्षण या कार्यक्रमाचे अन्नदाते नाझिमशेठ महमद हसनमिया नालखंडे हे गेली पंचविस वर्षे सतत अन्नदान करत आले आहेत यामध्ये विशेष

करून कुठेही धर्माच्या भिंती आडव्या न येता ईश्वर हा एकच आहे या न्यायप्रती ते दरवर्षी सेवा देतात या त्यांच्या कार्याची महती दुरवर पसरली असून या सेवेतून ईश्वर हा एकच आहे हा संदेश या उत्सवातून जात असल्याचे बोलले जात आहे व या महाप्रसादाचा लाभ जवळपास दहा हजारांहून अधिक भक्तगण घेतात असा अंदाज वर्तविला जात आहे.

व यामध्ये कुठेही कसूरता दिसून येत नाही. या दिमाखदार सोहळ्याची तयारी श्री बहिरेश्वर ग्रामस्थ मंडळ व युवक मंडळ शिहू करत आहेत.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत)